**MHKO050027992021**

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १८९/२०२१

निशाणी ५ वरील आदेश

**CNR No. MHKO050027992021**

श्री. रमेश रंगराव पाटील - वादी

विरुध्द

श्री. सनातन यशवंत शिंदे - प्रतिवादी

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादीविरुद्ध तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीने आपल्या अर्जामध्ये प्रतिवादी याने अगर तर्फे कोणाही ति-हाईत इसमांनी दावा मिळकतीमध्ये वादीचे असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीतुन वादीला हुसकावुन लावु नये, अशी तुर्तातुर्त मनाई देण्याची विनंती केलेली आहे.

०२. वादीच्या अर्जातील अभिकथने थोडक्यात पुढीलप्रमाणे**,**

वादीच्या अभिकथनाप्रमाणे दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज कलम १ मध्ये सवीस्तरपणे चतुःसिमापूर्वक नमुद केलेली शेत जमिन मिळकत ही या दाव्याचा विषय आहे. (येथुन पुढे सदर मिळकतीला दावा मिळकत असे संबोधण्यात येते.)

०३. वादीने पुढे असे कथन केले की, वादीने दावा मिळकत श्री. आप्पासो उर्फ वामन दत्तात्रय कडेकर यांच्याकडुन दि.०९/१०/२०१५ रोजी नोंदणीकृत दस्त क्रं.५९३०/२०१५ ने खरेदी केली. तेव्हापासून वादीची दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जे वहिवाट सुरु होती व आहे. खरेदी तारखेपासुन वादी दावा मिळकतीमध्ये कष्ट मशागत करुन विविध प्रकारची खरीब व रब्बी पिके घेत होते व आहेत.

दि.१५/०६/२०२१ रोजी प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये येऊन वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करुन वादीला दावा मिळकतीतुन हाकलुन देण्याची भाषा केली. म्हणुन वादीला प्रस्तुतचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल करणे भाग पडले. दावेचा गुणदोषावर निकाल होणेस अद्यापही दिनावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादीने वादीला दावा मिळकतीतुन हुसकावुन लावल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे कायमस्वरुपी नुकसान होईल. म्हणुन वादीने तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजुर करणेची विनंती केली.

०४. प्रतिवादीच्या म्हणण्यातील अभिकथने थोडक्यात पुढीलप्रमाणे,

प्रतिवादीन नि.१४ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र हरकत नोंदवली. प्रतिवादीने आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, अर्जातील कथने विधाने खोटी व बनावट असल्यामुळे ती त्याला मान्य व कबुल नाहीत. वादीने मिळकतीचे अपुरे वर्णन दिलेले असल्यामुळे मिळकतीचा अर्थ बोध होत नाही. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचीच प्रत्यक्ष कब्जा वहिवाट होती व आहे. दावा मिळकत ही मुळची श्री. विनायक दत्तात्रय कडेकर, श्री. गजानन दत्तात्रय कडेकर, श्री. आप्पासो दत्तात्रय कडेकर, साऊबाई दत्तुपंत व आंबुताई दिनकर दिवाण यांच्या मालकीची होती. तथापी त्या सर्वांना ती प्रत्यक्ष कसने शक्य नसल्याने त्यांनी ती यातील प्रतिवादी यांना भागाने कसनेस दिली आहे. श्री. वामन दत्तात्रय कडेकर यांनी प्रतिवादी यांना दि.२५/०४/२००९ रोजी ५० रुपयांचे स्टँम्पवर त्यांचे वहिवाटीस असलेले संपुर्ण क्षेत्र निम्म्याभागाने कायमस्वरुपी कसनेस दिले. तो स्टॅम्प वामन उर्फ आप्पासाहेब दत्तात्रय कडेकर यांनी स्वतः खरेदी केलेला होता. तसेच लिहुन देणार म्हणुन सही केलेली होती. साक्षीदार म्हणुन श्री. नरहरी केशव मनुकर व श्री. प्रविण शिंदे यांनी त्यावर सहया केलेल्या होत्या. तेव्हापासून प्रतिवादी कायमपणे आप्पासाहेब उर्फ वामन दत्तात्रय कडेकर यांचे वहिवाटीचे क्षेत्र कसत असतात. सध्याही ते क्षेत्र प्रतिवादी यांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटस आहे.

०५. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, मयत श्री. वामन उर्फ आप्पासाहेब

दत्तात्रय कडेकर यांनी दि.२५/०४/२००९ रोजी करुन दिलेला दस्त त्यांच्या हयातीत केव्हाही रद्द केला नाही अगर त्याबाबत कोणत्याही न्यायालयात वाद उपस्थित केलेला नाही. वामन कडेकर यांचे वारसांना कराराबाबत तसेच मिळकत प्रत्यक्ष प्रतिवादी यांचे वहिवाटीस असलेबाबत माहिती आहे. तथापी त्यांनी आजतागायत त्याबाबत वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी यांच्याकडे केवळ वामन कडेकर यांचेच नाही तर इतर सहहिस्सेदारांचे संपुर्ण क्षेत्र ०.९५आर कसनेस आहे. प्रतिवादी हे मिळणा-या उत्पन्नापैकी निम्मे उत्पन्न वामन कडेकर यांना प्रतीवर्षी देत होते. वामन कडेकर यांनी प्रतिवादी यांना जर क्षेत्र विकायचे झाले तर ते एकमेकांच्या विचाराने प्रतिवादी यांना खरेदी देण्यासंदर्भात करारात स्पष्ट लिहीले आहे.

०६. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, वादी यांनी दाव्यात उल्लेख केलेला दि.०९/१०/२०१५ रोजीचा तथाकथीत खरेदी दस्त बोगस व बनावट आहे. त्या दस्ताने वादीला कसलेही हक्क प्राप्त होत नाहीत. वादी हे मिळकतीत कधीही आलेले नाहीत. वादीला दावा मिळकत कोठे आहे याची माहिती नाही. प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये म्हणण्यापेक्षा संपुर्ण गट नं.१५६ मध्ये दरवर्षी ऊस, सोयाबीन अशी पिके घेत असतात. केवळ सोईकरिता ऊस ७/१२ पत्रकी ज्याचे नांव आहे त्या नावाने पाठवावा लागत असल्यामुळे त्या मालकांच्या नावाने पाठवतात व येणा-या बिलाची निम्मी रक्कम मालक प्रतिवादी यांना देत असतात. वादीचे त्या तथाकथीत खरेदीपत्राप्रमाणे अद्यापही ७/१२ पत्रकी नांव दाखल झालेले नाही. वादीने दावा मिळकतीमध्ये आपली कब्जेवहिवाट आहे हे दाखवणेकरिता कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. वादीने बनावट व बोगस कागदपत्राधारे दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केलेला आहे. शेवटी प्रतिवादीने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०७. अर्ज व म्हणण्यातील परस्परविरोधी अभिकथने, वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद, तसेच उभय पक्षकारांतर्फे दाखल करणेत आलेला कागदोपत्री पुरावा लक्षात घेता, प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले असून ते निष्कर्षासह कारणमीमांसेसहीत पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात काय? | होकारार्थी |
| २. | न्यायाचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे का? | होकारार्थी |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान होईल का? | होकारार्थी |
| ४. | वादी मागणीप्रमाणे प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळण्यास पात्र आहेत का? | होकारार्थी |
| ५. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

०८. वादीतर्फे विधिज्ञ श्री. कुरणे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. कुलकर्णी यांनी नि.२४ कडे दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. वादी प्रतिवादी तर्फे विधीज्ञांनी युक्तीवादा दरम्यान या कामी दाखल केलेल्या कागदपत्रांचा तसेच साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रांचा आधार घेतला.

०९. वादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वादीच्या मालकीहक्क कब्जेवहिवाटीची मिळकत असुन प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निकालास अद्यापही बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या कालावधीत प्रतिवादीने

वादीला दावा मिळकतीतुन हुसकावुन लावल्यास दाव्याचा हेतु संपुष्टात येणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत यावा.

१०**.** उलटपक्षी प्रतिवादी तर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीत वादीची कब्जेवहिवाट कधीही नव्हती व नाही. दावा मिळकतीत प्रतिवादीचीच कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे वादीला हरकत अडथळा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वामन कडेकर यांनी प्रतिवादीचे हक्कात दस्त करुन दिलेला आहे व त्याप्रमाणे मिळकत प्रतिवादीस कसनेस दिलेली आहे. तो दस्त वामन कडेकर यांनी त्यांच्या हयातीत कधीही रद्द केलेला नाही. मिळकतीचा कब्जा वादीकडे नसल्यामुळे वादीला कोणतीही मनाईची दाद मागता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

<u>मुद्दा क्र**.** १ ते ४ बाबत **:**</u> **-**

११**.** दाव्यातील सर्व कागदपत्रांचे व पक्षकारांच्या कथना विधानांचे अवलोकन केले. वादीने या कामी नि.३/१ कडे दावा मिळकतीच्या ७/१२ च्या प्रती दाखल केल्या आहेत, तसेच नि. ३/२ कडे दावा मिळकतीच्या खरेदीपत्राची प्रत हजर केलेली आहे. सदर कागदपत्रांच्या प्रथमदर्शनी अवलोकनावरुन असे दिसुन येते की, दावा मिळकत ही आप्पासाो उर्फ वामन दत्तात्रय कडेकर यांनी वादीला दि.०९/१०/२०१५ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी दिलेले आहे. सदर खरेदीपत्राचे अवलोकन केले असता पुढे असे देखील दिसुन येते की, सदरची विक्री ही आप्पासाो उर्फ वामन दत्तात्रय कडेकर यांनी त्यांचे कौटूंबिक गरजेकरिता व देणे भागवण्याकरिता दिलेली आहे. सदरच्या खरेदीपत्रामध्ये ही बाब देखील स्पष्टपणे नमुद आहे की, मिळकतीच्या खरेदी दिवशीच मिळकतीची कब्जेवहिवाट वादींना देण्यात आलेली आहे.

१२**.** प्रतिवादीने आपल्या म्हणण्यामध्ये मिळकत त्यांच्याकडे कसनेस आहे त्यासंदर्भात वामन कडेकर यांनी प्रतिवादीच्या हक्कात स्टॅम्प लिहुन दिलेला आहे अशी कथने विधाने केलेली आहेत. परंतु प्रतिवादीच्या म्हणण्यामधील या कथना विधानांना सकृतदर्शणी पृष्ठी देईल असा कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा तो तथाकथीत स्टँम्प

प्रतिवादीने या कामी हजर केलेला नाही.

१३. प्रतिवादीच्या कथनांप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादीचे नांव दाखल नाही. परंतु या ठिकाणी ही बाब येथे नमुद करणे योग्य आहे की, ७/१२ उत्ता-यावरील नोंदी या मालकीबाबतच्या नोंदी आहेत असा निष्कर्ष काढता येत नाही. त्या नोंदी या महसुल अधिकार अभिलेखपत्रकासाठी करण्यात आलेल्या असतात. त्याचप्रमाणे एक बाब येथे नमुद करणे योग्य व न्यायोचित आहे की, मिळकतीच्या ७/१२ सदरी प्रतिवादीचे नांव देखील कोठेही दाखल नाही. प्रतिवादीला मिळकत सन २००९ पासुन कसत आहे ही बाब प्रथमदर्शणी सिध्द होण्याकरिता कोणताही पुरावा या कामी उपलब्ध झालेला नाही.

१४. वादीने या कामी नि.२६/२ कडे दाखल केलेला दि.०१/०९/२०२१ रोजीच्या तक्रारी अर्जाच्या स्थळप्रतीवरुन ही बाब दिसुन येते की, प्रतिवादी याने वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीला दावा मिळकतीतुन हुसकावुन लावल्यास प्रतिवादीच्या तुलनेत वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होऊन वादीला आपल्या खरेदी केलेल्या मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस मुकावे लागणार आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचा हेतु संपुष्टात येऊन वादीचे कशानेही न भरुन येणारे कायमस्वरुपी नुकसान होणार आहे. त्याला आपल्या न्याय हक्कास मुकावे लागणार आहे. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई अनुतोषाकामी आवश्यक असणारी तत्वे, प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तराजु व न भरुन येणारे नुकसान ही तत्वे प्रतिवादीच्या तुलनेत वादीच्या हक्कात जास्त झुकतात. त्यामुळे मी मुद्दा क्रं. १ ते ४ चे उत्तर होकारार्थी नोंदविते.

<u>मुद्दा क्र. ५ बाबत :</u> -

१५. उपरोक्त विवेंचनानुसार तसेच वादी, प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद, वादी, प्रतिवादीतर्फे दाखल करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा याचा विचार करता, वादी अर्जातील कथने विधाने प्रथमदर्शनी सिध्द करण्यास यशस्वी ठरलेला आहे.

त्यामुळे, प्रथमदर्शनी केस, न्यायाचे समतोलत्व तसेच न भरुन येणारे नुकसान या तुर्तातुर्त मनाई अनुतोषाच्या कामी आवश्यक असणा-या बाबी सिध्द करण्यास यशस्वी ठरल्यामुळे मी मुद्दा क्र.५ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज खालीलप्रमाणे खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रस्तुत दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी अथवा त्यांच्या तर्फे कोणाही इसमांनी दावा मिळकतीमधील वादीच्या शांततामय मालकी कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीतुन वादीला हुसकावुन लावु नये अशी तुर्तातुर्त मनाई प्रतिवादीला देण्यात येते. |
| | ( येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
Aishwarya Sagar Jadhav
Date: 2022.05.06
17:39:54 +0530

दिनांक - ०६/०५/२०२२
इचलकरंजी

( सौ. ए. एस. जाधव )
४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Orders are same, word to word, as per the original Judgment /Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Jadhav |
| Name of Court | Sou. A. S. Jadhav,<br>4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Ichalkarnaji. |
| Date of Dictation | 06/05/2022 |
| Order signed by P.O. on | 06/05/2022 |
| Order uploaded on | 06/05/2022 |